# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ ४४२९ /२०१९ पुणे शहर, दिनांक १०.०५.२०१९

**विषय :- वाहतूक शाखेतील कर्मचारी यांना वायु प्रदुषणापासूनचे बचाव मास्कचे वाटप केले बाबत.**

-------------oo-----------

वाहतूक शाखा पुणे शहर कडील वाहतुक नियमन करणारे अधिकारी/कर्मचारी यांना, रोडवर चौकांमध्ये उभे राहून वाहतुक नियमनाचे कर्तव्य करावे लागते, सदरचे कर्तव्य करताना वायु प्रदुषणाचा त्रास होऊन फुफुसाचे आजार होत असतात, वायु प्रदुषणामुळे वाहतुक शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना त्रास व आजार होऊ नये याकरीता, मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर डॉ. श्री. के. व्यकंटेशम् यांचे व पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा श्री. पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतुन चांगल्या प्रतीचे मास्क वापरण्याचे नियोजन करुन, २००० मास्कची खरेदी करुन, सदरचे मास्क हे दिनांक-०९/०५/२०१९ रोजी, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा श्री. पंकज देशमुख यांचे हस्ते वाहतुक शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना वाटप करण्यात आले. मास्कचा वापर केल्यामुळे वाहतुक शाखेकडील अधिकारी/कर्मचारी यांना वायुप्रदुषणापासून काहीप्रमाणात संरक्षण मिळून बचाव होण्यास मदत होणार आहे.

सदर कार्यक्रम हा पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा, श्री. पंकज देशमुख यांचे हस्ते पार पडला असून सदर कार्यक्रमास सहा.पोलीस आयुक्त- प्रभाकर ढमाले, सहा.पोलीस आयुक्त- नागनाथ वाकुडे व पोलीस निरीक्षक(नियोजन)- जगन्नाथ कळसकर, पोलीस निरीक्षक(प्रशासन) ब्रम्हानंद नाईकवाडी व वाहतुक शाखेकडील सर्व वाहतुक विभाग प्रमुख उपस्थित होते.